# ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं. २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | नाहब्राह आसावरी सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेची वार्षिक सर्व साधारण सभा (२८ वी) AGM. रविवार दि. ३१-०३-२०२१ रोजी सायं ठीक ३.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात श्री. मधुकर पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. सभेला खालील सदस्य / पदाधिकारी उपस्थित होते. व खालील विषयावर चर्चा - विचार विनिमय करून निर्णय - ठराव घेण्यात आले. | |

| | सभासदाचे नांव | सदनिका क्र. | सही |
|---|---|---|---|
| 1 | अध्यक्ष - श्री. मधुकर पवार | D/302 | [signature] |
| 2 | सेक्रेटरी - " अशोक कदम | D/304 | [signature] |
| 3 | खजिनदार - " सुरेश शिरगांवकर | C-101 | [signature] |
| 4 | सदस्य - N.S. Hari | C 401 | [signature] |
| 5 | Lalit Mukundan | E, 501 | [signature] |
| 6 | Arun Krishnan Pallis | C-104 | [signature] |
| 7 | रघुनाथ गु. कांबळे | D 202 | [signature] |
| 8 | अशोक म. वाघमारे | D 201 | [signature] |
| 9 | | | |
| 10 | Meena K. Chandiramani | C-301 | [signature] |
| 11 | माधुरी राकेश शुक्ला | C-203 | माधुरी |
| 12 | श्री. अनिल महादेव तोरसकर | E-102 | [signature] |
| 13 | श्री. सागर श्यामसुंदर दुरे | E/303 | S.S. Dhu… |
| 14 | Khan Arif. | E-02 | K. Raj |
| 15 | Manish Shirsat | E-404 | [signature] |
| 16 | Bibiana Vaz | E-103 | [signature] |
| 17 | नलातीन | D 101 | [signature] |
| 18 | अरुणा अ. विचारे | E 202 | [signature] |
| 19 | विजय कृष्णा मांडवकर | D/102 | [signature] |

# MEETING MINUTE BOOK

ekal

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं.

Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | | REMARKS शेरा |
|---|---|---|---|
| | सभासदाचे नांव | सदनिका क्र. | सही |
| २० | नितेश दे. जगताप | E-104 | [signature] |
| २१ | अनंत तु. भारती | D/102 | उ भारती |
| २२ | रामचंद्र म. द्विवेदी | E/03 | रामचंद्र द्विवेदी |
| २३ | Priti H Mhatre | D/204 | P. H Mhatre |
| २४ | Prasad. M.R. | D/401 | Prasad. M.R |
| २५ | संजय रा० राणे | E/01 | [signature] |
| २६ | MAHESH S. GUJAR | C/201 | M.G. |
| २७ | Satyaprakash upadhyay | C/204 | [signature] |
| २८ | Arpita Anil Jadhav | C/104 | A. A. Jadhav |
| २९ | Santosh Gulab Lambate | D/03 | [signature] |
| ३० | अनुपमा जाधव | C/03 | A. A. Jadhav |
| 31 | विनोद राजधर | C/02 | A Vinod. |
| 32) | Shakuntala Shankar Chougule | D/104 | S.S.Chougule. |
| 33 | GAESh. B. Devmkhr | D/402 | [signature] |

सभेला सुरुवात करण्यापूर्वी खजिनदार श्री. सुरेश शिरगांवकर यांनी उपस्थितांचे समितीच्यावतीने स्वागत केले. कोरोना व्यथीत कोणाच्या घरी, नातेवाईक निधन झाले असतील किंवा संस्थेमध्ये, अशा व्यक्तींना संस्थेच्यावतीने दोन मिनीटे स्तब्धपणे उभे राहुन श्रद्धांजली वाहण्यात आली. पुढे सर्वांना प्रकृतीस्वास्थ चांगल्याप्रकारे निरोगी आयुष्य लाभावे अशाप्रकारे परमेश्वराकडे प्रार्थना करण्यात आली. आणि सभेच्या अध्यक्ष पदासाठी श्री मधुकर पवार यांची सुचना करून सभेला रितसर सुरुवात करण्यात आली

तद्नंतर श्री. मधुकर पवार यांनी अध्यक्ष पद स्विकारून आजच्या सभेच्या विषय सुचीप्रमाणे जे विषय आहेत त्याची आपण खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करून शांततेचे सहकार्य करावे असे सुचविले.

ANNUAL / SPECIAL GENERAL

वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं.

Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| विषय क्रं (१) | दिनांक २२ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणेबाबत | |
| ठराव क्रं (१) | मागील सभेचे इतिवृत्त वाचन सेक्रेटरी श्री. अशोक कदम यांनी केले असता इतिवृत्ताचा आढावा घेण्यात आला. व सविस्तर चर्चा करण्यात आली. इतिवृत्ता बाबत कोणाच्या काही शंका कुशंका असतील तर त्या सांगाव्यात. त्याचा खुलासा करण्यात येईल. व सभासदास वेळ देण्यात आला. | |
| | यावर श्री. मनिष शिरसाट E/404 यांनी प्रश्न उपस्थित केला की नवीन कार्यकारणीची निवड झालेलीच नाही जुन्या कार्यकारणीला पुढील कार्यभार सांभाळणे क्रमप्राप्त झाले. तर मग माझे नांव का वगळण्यात आले. याचा खुलासा करताना सेक्रेटरी श्री. अशोक कदम म्हणाले जनरली जे दोन सदस्य हजर नव्हते त्यांची नावे कमी करण्यात आली. त्यात श्री सत्यबोध आढाव हे देखील हजर नव्हते. श्री. श्यामसुंदर धुरे आपल्यात राहिले नाहीत. त्यावर मनीष शिरसाट म्हणाले की कार्यकारी सदस्य रद्द करण्यासाठी अधिकार कोणाचा असतो याची नियमात तरतूद असेलच याचा खुलासा व्हावा. | |
| | तदनंतर D-104 शकुंतला चौगुले मॅडम यांनी सांगितले की त्यांनी विचारलेला प्रश्न रास्त आहे यात सचिवाने लेखी स्वरूपात करणे आवश्यक होते. यानंतर श्री. सुरेश शिरगांवकर यांनी सांगितले की याच विषयांवर, मुद्द्यावर आपण चर्चा करत राहिलो तर पुढचे विषय महत्वाचे आहेत. याचा विस्तर खुलासा अध्यक्ष करतील. परंतु आपण काही गोष्टी समजून घेऊया. निर्णय घेताना त्या सदस्यांची काही चूक किंवा कारणे असावी लागतात त्याचा कोणीच विचार करत नाही. एका सदस्याने सूचना करावी व आपण ती मान्य करावी. या गोष्टीला दोन वर्षाचा कालावधी लोटला आहे. बोर्ड फलकावर मनीष शिरसाट यांचे नांव असून आहे व आता नवीन कार्यकारणीच्या निवडीचा विषय असल्यामुळे त्यात अवश्य श्री. मनीष शिरसाट यांचे नाव असावे. | |

# MEETING MINUTE BOOK

ekal

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं.

Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | यापुढे हा मुद्दा बंद करावा असे मला वाटते. यावर अध्यक्ष श्री. मधुकर पवार यांनी सांगितले की दोघांचीही त्यात चूक आहे. परंतु यापुढे त्याची निश्चितपणे दक्षता घेतली जाईल. यानंतर इतिवृत्ताबाबत कोणाचीही हरकत नसल्यामुळे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले. | |
| | सूचक :- मनिष शिरसाट | |
| | अनु :- सुरेखा शिरगांवकर | |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| विषय क्रं. ② | संस्थेच्या दिनांक ०१-०४-२०१९ ते दि. ३१-०३-२०२० च्या आर्थिक कालावधीचा जमा-खर्च, नफा तोटा व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणेबाबत. | |
| ठराव क्रं. ② | जमाखर्चाचे वाचन करण्यापूर्वी आपल्या संस्थेचे बिलींगचे काम पहात असलेले श्री. अमीतकुमार यांची प्रथम शिरगांवकर यांनी ओळख करून दिली. आणि अमीत यांनी सभेसमोर दि. ३१-०३-२०२० अखेरचे जमा खर्च पत्रक व ताळेबंद पत्रकाचे वाचन केले. त्यानंतर आढावा घेण्यात आला. सविस्तर चर्चा करण्यात आली. यावर उपस्थित सदस्यांच्या शंका विचारण्यात आल्या. | |
| | श्री. मनिष शिरसाट म्हणाले की प्रत्येक वर्षी अहवालात सिंकींग फंड, नवीन पाण्याचे कनेक्शन, मोटर पंप, ग्रील गेट व जमीन इमारत अशाप्रकारचे जे हेडखाली अमाऊंट दाखविली जाते. त्या रक्मा पुढच्या अहवालाच्या वेळी, हिशोबाप्रमाणे रद्द व्हायला पाहिजेत. म्हणजेच आपल्या संस्थेकडे ज्या जमा रक्मा दाखविल्या जातात त्या येणार नाहित. याची दक्षता घ्यावी. यानंतर श्री. शिरगांवकर यांनी सभेला विचारणा केली की, सिंकींग फंड नेमका कोणत्या कामासाठी असतो व कसा वापरला जातो. सध्या संस्थेकडे मुदत ठेवीमध्ये जी रक्कम होती. ती फायलेड साठी वापरण्यात आली. त्याची वसुली सुरु आहेच. तेव्हा | |

# ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं.                Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | यावर श्री मधुकर पवार यांनी सांगितले की संस्थेची एफ.डी. म्हणजेच तो सिंकिंग फंड म्हणून संस्थेच्या अतिशय तातडीच्या - महत्त्वाच्या कामासाठी त्याचा विनियोग खर्च करु शकते. परंतु आपण मेंटेनन्स मध्ये जो पगार वाढीव सिक्युरिटी फेर आकारण्यात येतो तो आता डिफ्रीक्स म्हणून बँकेत असलेल्या सेव्हिंग खात्यात जमा करण्यात यावा. | |
| | तदनंतर शकुंतला चौगुले मॅडम यांनी सुचित केले की संस्थेच्या बिल्डींग इन्शुरन्स भरण्यात आलेला नाही. तो देखील लवकर होण्यात यावा. तसेच श्री शेणे, वर्मा, म्हामदाकूर आर्किटेक्ट पॅनल रिपोर्ट PMC स्ट्रक्चरल टेस्टिंग रिपोर्ट, इत्यादींची कामे फायनल झाली असतील तर त्यांचे पेमेंट करण्यात यावे. म्हणजेच पुढील कामासाठी गती मिळेल. यानंतर जमा-खर्च व ताळेबंद बाबत कोणाचीही हरकत नसल्यामुळे जमाखर्च व ताळेबंद सर्वानुमते पास करण्यात आला. | |
| | सूचक : सौ. शकुंतला चौगुले<br>अनु. : - श्री. मधुकर पवार<br>ठराव सर्वानुमते मंजूर | |
| विषय नं. ③ | सन २०२० ते २०२५ या कालावधीकरिता नवीन कार्यकारिणीची (व्यवस्थापक समिती) निवड करणेबाबत - | |
| ठराव नं. ③ | वरील सदर विषय चर्चेसाठी ठेवला असता श्री मधुकर पवार यांनी सांगितले की व्यवस्थापक समितीच्या निवडीचा विषय दोन वर्षे वार्षिक सभेच्या अजेंड्यावर असताना देखील कोणी पुढे होऊन पुढाकार घेत नाहीत. म्हणून आजच्या आजपर्यंत ह्या कार्यकारिणीला कार्यभार सांभाळणे क्रमप्राप्त झाले. तेव्हा आजच्या तरी सभेच्या नवीन कार्यकारिणीची निवड व्हावी. यावर सर्वांच्या मताने एकविचार होऊन असे सुचित करण्यात आले की प्रत्येक विंगवाईज चार - चार सदस्यांची नावे सुचित करण्यात यावी. त्याप्रमाणे सी - विंग सदस्य - श्री | |

# MEETING MINUTE BOOK

ekal

## सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं.　　　　　　　　　　　　　Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|

श्री अरुण के. पाटील, महेश गुजर, C-201 -, माधुरी शुक्ला - C-203 श्री सतीश गुजर - C-102, तसेच डी-विंग श्री विजय मांडवकर, रघुनाथ कांबळे, त्रिभुवन शर्मा, एम. आर. प्रसाद, व ई-विंग सदस्य - श्री मनिष शिरसाट, सागर खुरे, संजय राणे, श्रीमती अरुणा विचारे. अशाप्रकारे एकूण (12) सदस्यांची नांवे सुचीत करण्यात आली. त्यानुसार

असा ठराव करण्यात आला की, समितीमध्ये जी तीन महत्वाची पदे असलात त्याची निवड व्हावी. त्याप्रमाणे

(1) अध्यक्ष - अरुण के. पाटील
सुचक - श्री त्रिभुवन शर्मा
अनु - " विजय मांडवकर

(2) सेक्रेटरी - श्री महेश गं. गुजर
सुचक - " अरुण पाटील
अनु० - " मनिष शिरसाट

(3) खजिनदार - श्री. मनिष शिरसाट
सुचक - " सागर खुरे
अनुमोदक - " माधुरी शुक्ला

सदस्य (1) श्री सतीश गुजर
" (2) सौ. माधुरी शुक्ला
" (3) श्री विजय मांडवकर
सदस्य - (4) श्री त्रिभुवन शर्मा
(5) " - रघुनाथ कांबळे
(6) " - एम. आर. प्रसाद
(7) " - सागर खुरे
(8) श्री. संजय राणे
(9) श्रीमती. अरुणा विचारे

अशाप्रकारे सर्वानुमते व्यवस्थापक समितीची निवड निश्चित करुन तसा सर्वांच्या मान्यतेचा बँकेच्या ठराव देण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले - व शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच चेअरमन, सेक्रेटरी, खजिनदार ह्यांपैकी कोणी दोघे बँकेच्या व्यवहारासाठी सही करतील.

सुचक :- श्री मधुकर पवार
अनु :- " अशोक वाघमारे
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रं. (4) स्ट्रक्चरल रिपोर्ट व पी.एम.सी रिपोर्टबाबत चर्चा व पुढील रिपेअर्स कामाचा आढावा घेणे.

ठराव क्रं. (4) वरील विषयाबाबत चर्चा करणेआधी ज्यांच्याकडे हि रिपोर्टसंबंधी कामे दिलेली होती. त्याची प्रथम Mandapur Associates - वसई-विरार पॅनल मंडळी, श्री. वर्मा, श्री. राणे

# ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Date / तारीख

Meeting No. / सभा नं.

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | श्री. तिरोडकर (आर्किटेक्चर) सोबत असलेले इंजिनिअर यांची ओळख करून देण्यात आली. तदनंतर रिपोर्ट संदर्भात माहिती देण्यास सभागृहाने सांगितले. यावर श्री. वर्मा, राणे साहेब इंजिनिअर यांनी सांगितले की जे आपण आमच्यावर काम सोपविले होते ते आम्ही व्यवस्थित पूर्ण केले आहे. त्याबाबत स्ट्रक्चरल रिपोर्ट, टेस्टिंग रिपोर्ट, सर्व रिपोर्ट संस्थेकडे देण्यात आला आहे. परंतु त्या रिपोर्ट प्रमाणे आपण सद्यस्थितीत फार तर १ वर्ष राहू शकता. पुढे काय करायचे आहे व कसे करायचे ते तुमच्या सर्वांच्या विचारावर आहे. आम्हाला अजूनही पुढे स्टडी करायची आहे. तेव्हा तुम्हाला PMC च्या रिपोर्टचा खुलासा करण्यात येईल. या पुढच्या विचारानंतर आम्हाला तुम्ही चर्चेत भाग घेण्यासाठी बोलवा. त्याच्या व्यवस्थेत खुलासा करण्यात येईल. व जी बॉक्स फाईल आमच्याकडे सोसायटी संदर्भात सर्टिफाईड कॉपीचे पेपर असलेली त्यांच्याशी पूर्णपणे देण्यात येईल. किंवा आपण आतापण घेऊ शकता. परंतु त्यात जे काही POD सारखे महत्वाचे पेपर असणे आवश्यक असल्यामुळे ते पेपर घेऊनच आम्हाला ती फाईल लवकरात लवकर देण्यात यावी. असे सांगण्यात आले.<br>तदनंतर आर्किटेक्चर श्री. तिरोडकर साहेब यांनी संस्थेच्या सदस्यांना उपस्थित सभागृहाला माहिती देताना सांगितले की आपल्याला कसे जायचे आहे हे प्रथम सर्वानुमते विचार होणे आणि महत्वाचे आहे. आपल्याला सेल्फ डेव्हलपमेंटला जायचे असेल तर त्याचे फायदे-तोटे, शिवाय रिडेव्हलपमेंटला जायचे असेल तर त्याचे काय फायदे आहेत. याची संपूर्ण माहिती दिली. अगदी इत्यंभूत व्यवस्थीत माहिती समजावून सांगितली. त्याबद्दल संस्थेच्यावतीने आभार मानण्यात आले.<br>त्यानंतर श्री. मनिष शिरसाट यांनी सदनिका धारकांचे सद्यस्थितीत सदनिकेबाबत असलेले त्याबाबत विचारणा केली. त्याचा देखील खुलासा करण्यात आला. ह्या पुढील चर्चेत श्री. शिरगांवकर यांनी आपली शंका विचारली की, पाच टप्प्याचे कालक्रम कोणता आहे. सेल्फ डेव्हलपमेंटला | |

MEETING MINUTE BOOK ekal

सभेचे मिनिट बुक

Meeting No. / सभा नं.

Date / तारीख

| RESOLUTION NO. ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| | आणण्यासाठी फेडरेशनची टेस्टीम स्थापना करण्यात आली तेव्हा सांगितले गेले की, कॉम्प्लेक्स शिवाय व्यवसायिक संस्थेला रिडेव्हलपमेंटला आता येत नाही. तरी सेल्फ किंवा रिडेव्हलपमेंटला एक-एक सोसायटी जाऊ शकते काय? त्याचा ही खुलासा करण्यात आला. त्यासाठी आपली सर्वांची तयारी असेल तर का जाऊ शकत नाही. काहीच अडचण नाही. जरूर जाऊ शकता असे सांगण्यात आले. यानंतर Mandapam Associates यांनी जे काम झालेले असल्यामुळे त्यांची त्यासंदर्भात असलेले बाकी पेमेंट देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. | |
| | सूचक :- सौ. शकुंतला चौगुले | |
| | अनु :- श्री महेश कुमार | |
| | ठराव सर्वानुमते मंजूर | |
| विषय क्र. (५) | अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे - व निर्णय घेणे | |
| ठराव क्र. (५) | या विषयाबाबत सभेचे अध्यक्ष श्री. मधुकर पवार यांनी सांगितले की, बी. विंग समोरील ~~कोणत्याच~~ कंपाउंड काम, संस्थेच्या आवारातील मधली सगळी झाडे सेक्रेटरींनी आपल्या पदाचा गैरवापर करून तोडली. त्यात बिएमसी परमिशन नाही आणि ही कामे करताना व्यवस्थापकीय समितीच्या अध्यक्षांना काहीच माहिती नाही. मिटींगमध्ये चर्चा नाही. तेव्हा हा मनमानी कारभार आहे. म्हणून मी अध्यक्ष पदाचा व खजिनदार श्री शिरसावकर यांनीही दोघांनी राजीनामा दिला. त्याचा खुलासा करताना श्री. अशोक कदम म्हणाले की, मी कमिटीला सांगितले होते. त्याप्रमाणे विचाराने काम करण्यात आली. यावर सौ. शकुंतला चौगुले यांनी सांगितले की, जर समितीला सांगितले तर अध्यक्षांना माहिती का नाही? तेव्हा यापुढे तरी असे होता कामा नये. रितसर कमिटीच्या माध्यमाद्वारे कामे व्हावीत असे सांगितले. | |

# ANNUAL / SPECIAL GENERAL

## वार्षिक / विशेष सर्वसाधारण

Meeting No. / सभा नं. | Date / तारीख

| RESOLUTION NO.<br>ठराव नं. | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS<br>हजर सभासद व ठराव | REMARKS<br>शेरा |
|---|---|---|
| | त्याचप्रमाणे सेक्रेटरी श्री. अशोक कदम म्हणाले की.<br>मी संस्थेचा कन्व्हेयन्स केलेला आहे त्याच्या एकूण रक्कमेपैकी<br>रु. ३,३३,०००/= मधुन रु. ३ लाख पेमेंट देण्यात आलेले आहे<br>संस्थेच्या कन्व्हेयन्सची ओरिजिनल कॉपी-पेपर संस्थेच्या अध्यक्षांकडे देण्यात<br>आले आहेत. तरी बाकी रु. ३३ हजार मला मिळावेत अशी मागणी<br>केली. तरी यावर सभागृहाने सांगितले की जर संस्थेकडे ओरिजिनल<br>कॉपी-पेपर जमा असतील तर अधिक काही चर्चा न करता<br>आपला लिगल ॲडव्हाईझर ज्यावेळी नेमण्यात येईल त्यावेळी<br>त्यातील ज्या काही त्रुटी असतील त्या समजावून घेऊ. तेव्हा<br>त्यांचे बाकी असलेले फायनल पेमेंट देण्यात यावे. असे<br>सर्वानुमते ठरले. | |
| | तसेच पुढील कामाच्या दृष्टीने संस्थेच्या हिताच्या<br>विचारातून सदनिका धारकांकडे असलेला थकीत मेन्टेनन्स<br>लौकरात लौकर देण्यात यावा. शिवाय संस्थेला स्थिर वॉचमन<br>रिक्त नसल्यामुळे सिक्युरिटीचे लोक वॉचमन ठेवण्याबाबत<br>विचार करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. तदनंतर<br>काही विषय नसल्यामुळे खेळीमेळीच्या वातावरणात<br>सभा पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन सभा<br>संमारोप करण्यात आली. | |
| | सूचक - श्री. अशोक कदम.<br>अनु. - " अरुण पाटील<br>ठराव सर्वानुमते पास. | |

लिपिक
उपनिबंधक
सहकारी संस्था,
13/6/2017

For NAD-BRAHMA ASAVARI CO-OP.HSG.SOC.LTD.

CHAIRMAN SECRETARY TREASURER